# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# प्रचंड वेगाने धावणाऱ्या जगात ज्ञान हीच संपत्ती

### चंद्रकांतदादा पाटील यांचे प्रतिपादन : पाटण येथे नवीन अभ्यासक्रमांचा शुभारंभ : अद्ययावत संगणक प्रयोगशाळेसह विस्तारित इमारतीचे उद्घाटन

वार्ताहर
पाटण

सामर्थ्यशाली देशाच्या जडणघडणीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अवलंबले आहे. शिक्षणक्षेत्रात कोयना एज्युकेशन सोसायटी मोलाची भूमिका बजावत आहे. शासनाच्या 'उषा' योजनेतील समावेश तसेच येथील सीईटी सेंटरबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल. प्रचंड वेगाने धावणाऱ्या जगात पैसा नाही तर ज्ञान हीच संपत्ती असल्याचे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले.

येथील कोयना एज्युकेशन सोसायटीच्या बी. डी. कॉलेजमधील विविध नवीन अभ्यासक्रमांचा शुभारंभ तसेच नवीन अद्ययावत संगणक प्रयोगशाळा व विस्तारित इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष आमदार अतुलबाबा भोसले, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर, संस्थेचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, संचालक याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण, ज्येष्ठ नेते हिंदूराव पाटील, सिनेट सदस्य अमित



**पाटण : कार्यक्रमात बोलताना चंद्रकांतदादा पाटील. समवेत आमदार अतुलबाबा भोसले, सत्यजितसिंह पाटणकर, अमरसिंह पाटणकर, याज्ञसेन पाटणकर, हिंदुराव पाटील व मान्यवर.**

कुलकर्णी, जॉईंट सेक्रेटरी डॉ.सुहास देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

चंद्रकांतदादा पाटील पुढे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशात व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात गुणवत्तापूर्ण, अद्ययावत शिक्षण तसेच डिजीटल क्षेत्रात देश अग्रगण्य बनविण्यासाठी विशेष भर दिला आहे. पाटणसारख्या दुर्गम भागात कोयना एज्युकेशन संस्थेने शिक्षणाची वेगवेगळी दालने खुली करून विद्यार्थ्यांसाठी चांगल्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. यापुढेही संस्थेला जी काही मदत लागेल ती करण्यात येईल.

आमदार अतुल भोसले म्हणाले, राज्याच्या शिक्षण व्यवस्थेत आमुलाग्र बदल घडविण्याचे काम चंद्रकांतदादांच्या नेतृत्वाखाली सुरू आहे. मुलींना मोफत शिक्षण देण्याचा धोरणात्मक निर्णय देशाला दिशा देणारा ठरला आहे. कोयना एज्युकेशन सोसायटी विविध शाखांच्या माध्यमातून दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना नवनवीन शैक्षणिक ज्ञानाची दालने उपलब्ध करून देत आहे ही कौतुकास्पद बाब आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सत्यजितसिंह पाटणकर यांच्यावर विशेष लक्ष आहे.

#### संस्थेच्या कार्याचा गौरव

आ. अतुलबाबा भोसले यांनी माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर, अमरसिंह पाटणकर, डॉ. सोपानराव चव्हाण, सत्यजितसिंह पाटणकर यांच्या तसेच संस्थेच्या कार्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. राजकारणात यशस्वी होत नाही तोपर्यंत सल्ला देणारे सल्लागार आणि यश मिळाले की कौतुक करणाऱ्यांची संख्या वाढते. अशापासून लांब राहून कामामध्ये लक्ष घालणे कधीही चांगले असते असे सांगून कार्यकर्ता चलाख असला पाहिजे असे आपल्या खुमासदार शैलीत सांगितले.

सत्यजितसिंह पाटणकर म्हणाले, कोयना एज्युकेशन सोसायटीची १९६७ मध्ये स्थापना झाली. पत्र्याच्या शेडमधून आतापर्यंत अद्ययावत इमारतीपर्यंतचा प्रवास सर्वांनी पाहिला आहे. स्व.के. व्ही.पाटील, स्व. दादासाहेब पवार, स्व. भागवतराव देसाई, स्व. श्रीमंत उदयसिंह पाटणकर, स्व. युसूफभाई शेख, स्व.श्रीपतराव मोळावडे, स्व. अनंतराव देसाई यांच्या खांद्याला खांदा लावून डॉ. सोपानराव चव्हाण, अमरसिंह पाटणकर यांनी केलेल्या कष्टातून संस्था नावारूपाला आली. १९८३ पूर्वी तालुक्यातील अनेक गावात, वाडीवस्तीवर वीज, रस्ते, पाणी, शिक्षण आरोग्य अशा मुलभूत गरजा उपलब्ध नव्हत्या. विक्रमसिंह पाटणकर यांनी दूरदृष्टीने प्रत्येक वाडीवस्तीवर अशा सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या. मागच्या दहा वर्षात विकासाबाबत सकारात्मक निर्णय झाले नाहीत.

यावेळी राजाभाऊ शेलार, सुभाषराव पवार, ॲड.अविनाश जानुगडे, बाळासाहेब राजेमहाडिक, नगराध्यक्षा सौ. अनिता देवकांत, पूजा कदम, नारायण सत्रे, अभिजित पाटील, निवासराव निकम, रवी पाटील, सचिन जाधव आदींसह संस्थेचे सर्व संचालक, विविध संस्थांचे पदाधिकारी, पालक, प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते. याज्ञसेन पाटणकर यांनी स्वागत केले. संजीव चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. प्रा. दीपक डांगे–पाटील यांनी सुत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. एस.डी. पवार यांनी आभार मानले.